# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व ),मुंबई -४०० ०५१.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दू.क्र: ०२२-६२५४२१००
ई.मेल: secretary @ msbte.com
संकेतस्थळ:www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/का.४२/उ.प. २०२२/ ३७५ दिनांक 19 MAY 2022

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्न सर्व तंत्रनिकेतने
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्य पदविका अभ्यासक्रम)

**विषय:-** मंडळाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षण व परीक्षा योजने (Teaching Examination Scheme) नुसार online परीक्षा असलेल्या विषयांसाठी द्वितीय घटक चाचणी परीक्षेची (Class Test) सविस्तर कार्य प्रणाली.

**संदर्भ:-** जा.क्र.मरातंशिमं/का.४२/उ.प. २०२२/३७३ दिनांक-१०.०५.२०२२.

उपरोक्त संदर्भातील परिपत्रकानुसार ज्या विषयांसाठी Teaching Examination Scheme नुसार Online परीक्षा घ्यावयाची आहे अशा विषयांसाठी व्दितीय घटक चाचणी परीक्षेचे वेळापत्रक व ढोबळ कार्य पध्दतीची घोषणा करण्यात आली होती. सदर विषयांच्या online व्दितीय घटक चाचणी परीक्षेसंदर्भात संस्था, पर्यवेक्षक व संबंधित विद्यार्थी यांच्या तर्फे राबवावी लागणारी सविस्तर कार्य पध्दती खालीलप्रमाणे आहे :

१. संस्थास्तरावरील कार्यप्रणाली.
   अ. दिनांक २३.०५.२०२२ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावरील Online Activities या सदराखाली MSBTE Theory Exam Link वर संस्थेच्या Login मध्ये घटक चाचणी परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांना Online Examination Link, User ID व Password उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर User ID व Password संबंधित विद्यार्थ्यांना पुरविण्याची कार्यवाही संस्थेने पूर्ण करावी.
   ब. दिनांक २४.०५.२०२२ रोजी संस्थेच्या Login मध्ये अभ्यासक्रम / विषय निहाय तसेच परीक्षा दिनांक व Slot निहाय लागणा-या पर्यवेक्षकांची संख्या (Invigilator), त्यांचे User ID व Password उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर माहिती चा वापर करून विभाग निहाय Coordinators ने चाचणी परीक्षेचे आयोजन करावे.
   क. चाचणी परीक्षेसाठी विभाग निहाय व विषय निहाय विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गातील Roll No. नुसार ३० विद्यार्थ्यांसाठी १ Block याप्रमाणे चाचणी परीक्षेसाठी बसविण्याची व्यवस्था करावी व त्याची माहिती सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सुचित करावी.
   ड. चाचणी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा Slot च्या १५ मिनिटे आधी उपस्थित करून घ्यावे व सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या Block नुसार बसवून घेण्याची व्यवस्था करावी.
   इ. प्रत्येक Block वर विभागातर्फे नेमण्यात आलेल्या पर्यवेक्षकांना (Invigilator) त्यांचे User ID व Password पुरवून Block वर पर्यवेक्षाणासाठी पाठविण्यात यावे.

२. संस्थेतर्फे / विभागातर्फे नेमण्यात आलेल्या पर्यवेक्षकाची (Invigilator) कार्यप्रणाली .
   अ. पर्यवेक्षणासाठी लागणारे User ID व Password विभागाच्या Co-ordinator कडून उपलब्ध करुन घ्यावा.
   ब. घटक चाचणी परीक्षा सुरू होण्याच्या १५ मिनिटे आधी परीक्षा Block मध्ये हजर राहून स्वत:चे Samrtphone / Laptop वापरुन मंडळाच्या संकेतस्थळावरील MSBTE Theory Exam Link वर Invigilator Login मधून Login करून त्यात Attendance of Students मध्ये अभ्यासक्रम व विषय निवडावा.
   क. घटक चाचणी परीक्षेसाठी Block मध्ये Roll No प्रमाणे उपस्थितीत राहिलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची Enrollment No. प्रमाणे उपस्थिती नोंद करावी. उपस्थिती नोंदविल्यानंतर मिळणारा Test code संबंधित विद्यार्थ्यांस पुरविण्यात यावा.

ड. घटक चाचणी परीक्षेच्या वेळी परीक्षार्थी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी सक्षमपणे पर्यवेक्षण करावे.

३. विद्यार्थी स्तरावरील कार्यप्रणाली.

अ. दिनांक २३.०५.२०२२ रोजी संस्थेतील संबंधित विभागाकडून घटक चाचणी परीक्षेसाठीची Online Examination Link, User ID व Password प्राप्त करुन घ्यावी.

ब. घटक चाचणी परीक्षेसाठी वेळापत्रकात उल्लेख केलेल्या वेळेपेक्षा १५ मिनिटे आधी नियोजित परीक्षा Block मध्ये हजर राहावे.

क. परीक्षा Block मधील पर्यवेक्षकांकडे परीक्षेसाठीची उपस्थिती नोंद करुन घ्यावी व त्यांच्याकडून Test Code घ्यावा.

ड. घटक चाचणी परीक्षेसाठी वापरावयाच्या Camera Enabled Smart Phone / Laptop / Tab वरुन परीक्षेसाठी Login करावे व परीक्षेचा Slot सुरु झाल्यावर Test Code वापरून परीक्षा सुरू करावी.

इ. कोणताही गैरप्रकार न करता व्यवस्थितपणे घटक चाचणी परीक्षा online पध्दतीने पूर्ण करावी.

सर्व संबंधितांनी वरील कार्यप्रणालीचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,
उपसचिव (तां.) म. रा. तं. शि. मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.